मिरा भाईंदर महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी gad@mbmc.gov.in

जा. क्र. मनपा/सा.प्र./५५७/२०२६-२७ दि.०५/११/२०२६.

// आदेश //

विषय :- छठपूजा उत्सव सुव्यवस्थितरितीने पार पाडणेकरीता कामकाजाचे वाटप करणेबाबत.

संदर्भ :- जा.क्र.मनपा/साबा/विद्युत/क.अ.१/५४९०/२०२६-२७ यांचे दि.०४/११/२०२६ रोजीचे पत्र.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उत्तर भारतीय समाजामार्फत छठपूजेचा उत्सव रविवार दि. १५/११/२०२६ व सोमवार दि. १६/११/२०२६ रोजीपर्यंत साजरा होणार आहे. छठपूजेनिमित्त मोठया प्रमाणावर महिला वर्ग पूजाविधी करण्यासाठी एकत्रीत जमणार असल्याने व सदरची सुर्यपूजा ही पाण्यात उभे राहुन करावयाची असल्याने कोणतीही अनुचीत घटना घडु नये करीता व सदरचा कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून खालील ठिकाणी देखभाल, देखरेख करणेकरीता महानगरपालिकेच्या वतीने आवश्यक त्या उपाययोजना करणे आवश्यक आहे.

१) भाईंदर (प.) एस.टी.बस डेपो
२) भाईंदर (पूर्व) जेसलपार्क चौपाटी (नवीन)
३) भाईंदर (पूर्व) जेसलपार्क चौपाटी (जुनी)
४) भाईंदर (पूर्व) नवघर तलाव (एस.एन.कॉलेज समोर)
५) शिवार गार्डन, मिरारोड (पू.)
६) जरीमरी तलाव, काशी
७) सातकरी तलाव, मिरागाव
८) साईदत्त तलाव, पेणकरपाडा

तरी वरील ठिकाणी छठपूजा सुव्यवस्थित व चांगल्या रितीने पार पाडण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे अधिकाऱ्यांची नेमणुक करण्यात येत आहे.

अ.क्र	अधिकाऱ्याचे नाव	सोपविण्यात आलेल्या कामाचे स्वरुप
१	शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग	वरील नमुद ठिकाणी कृत्रिम पाण्याचे तळे, दिवाबत्ती, माईक, स्पिकर, बॅरिकेट, मंडप, खुर्च्या, टेबल बैठक व चौपाटीवर अद्यावत होडयांची व्यवस्था इ. ची व्यवस्था करण्यात यावी.

२	उपायुक्त, सार्व.आरोग्य विभाग	सदर नमुद ठिकाणी रूग्णवाहीकेसह वैदयकिय पथके आवश्यक प्राथमिक औषध उपचारासह उपस्थित राहणेकरीता आपल्या अधिनस्त कर्मचारी यांना आदेशित करावे.
३	सहा. आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग	सदर नमुद ठिकाणी आरोग्य विभगातील कर्मचारी यांची आपले स्तरावर नियुक्ती करण्यात यावी. तसेच सदर ठिकाणी साफसफाई ठेवण्यात यावी. त्याचप्रमाणे सदर ठिकाणी निर्माल्य कलश ठेवून त्यातील निर्माल्याची जैवीक पध्दतीने विघटन करण्यात यावे.
४	मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग	वरील नमुद ठिकाणी आपल्या अग्निशमन दलाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची व उत्कृष्ट जलतरण पट्टुणची नेमणुक करून आवश्यक त्या लाईफ जॅकेट, इमर्जन्सी लाईट इत्यादी साहित्यासह छठपुजा पूर्ण होई पर्यंत उपस्थित राहणे करीता आदेशित करावे.
५	कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा व मलनि:सारण विभाग	वरील नमुद ठिकाणी आवश्यक त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, टँकर पुरवठा तसेच पिण्याच्या पाण्याचे वाटप व्यवस्थेकरिता आपल्या विभागातील कर्मचाऱ्यांची नेमणुक करण्यात यावी.
६	सहा.आयुक्त तथा प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र.०१ ते ०६	वरील नमुद ठिकाणी छठपूजा कालावधीतील संपूर्ण प्रक्रियेचे नियंत्रण आपणाकडे सोपविण्यात येत आहे. तसेच आपण आपल्या प्रभाग कार्यालयातील अधिनस्त कर्मचारी यांची नेमणूक करण्यात यावी.
७	सहा.आयुक्त आस्थापना विभाग	वरील नमुद ठिकाणी जनसमुदयास नियंत्रीत करण्याकरीता सुरक्षा रक्षकांची नेमणुक करावी
८	जनसंपर्क अधिकारी जनसंपर्क विभाग	विसर्जन ठिकाणांची यादी व्यापक प्रमाणात प्रसिध्द करण्यात यावी.
९	विभाग प्रमुख, भांडार विभाग	विसर्जन ठिकाणांच्या स्थळी बॅनर प्रदर्शित करणेकरिता ते छपाई करुन सर्व प्रभाग समितीचे सहा.आयुक्त यांचेकडे उपलब्ध करुन देण्यात यावे.
१०	सिस्टीम ॲनालिस्ट ई-टेंडरींग विभाग	छठपुजा उत्सव करणाऱ्या ठिकाणी सी सी टिव्ही कॅमेरेचे नियोजन करण्यात यावे.

वरील प्रमाणे नमुद अधिकाऱ्यांनी सोपविलेले कामकाजांची जबाबदारी पार पाडावी. याबाबत हलगर्जीपणा होणार नाही याची सर्वतोपरी दक्षता घ्यावी.

(प्रणाली घोंगे)
उपायुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव :-
१) मा.आयुक्त महोदय, मि.भा.मनपा
२) मा.अति.आयुक्त (१ व २) मि.भा.मनपा